I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 144-150
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# चंद्रपूर जिल्हयातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कौटुंबिक व सामाजिक समस्याचे अध्ययन

**पितांबर विठोबाजी पिसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर
*Corresponding Author :- ppitambar25@gmail.com

| Communicated : 20.01.2023 | Revision : 28.02.2023<br>Accepted : 27.03.2023 | Published : 30.05.2023 |
| --- | --- | --- |

**सारांश :**

जगातील प्रत्येक देशात समाज व राष्ट्राच्या विकासातील महत्वाचा घटक म्हणजे महिला होय. तरीही जगभरातील महिलांना आजही उपेक्षित जीवन जगावे लागते. महिलांचे सक्षमीकरण, स्त्री मुक्ती, स्त्रियांचे परिवर्तन, स्त्रियांचा विकास हे विषय आज महत्वपूर्ण झाले आहेत. तरीही काही प्रमाणात आज महिलांच्या सामाजिक समस्या व व्यक्तीगत समस्या दुर्लक्षित राहील्या आहेत. नोकरी करणाऱ्या महिला हया विकासाचे प्रतिक मानल्या जातात. अनेक महिलावादी विचारवंताच्या मते नोकरी करणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण हे महिलांचे सक्षमीकरण दर्शविते. मागील काही वर्षात महिलांच्या जीवनशैलीत महत्वपूर्ण बदल झालेला आहे. सामाजिक परिवर्तनाच्या लाटेत स्त्रियांना परंपरागत रूढीवादी भूमिकेपासून काही प्रमाणात मुक्ती मिळाली आहे. तरीही एक गृहिणी, माता व इतर कौटुंबिक भूमिकेसोबत एक कर्मचारी म्हणून समाजात वावरतांना तिला तारेवरची कसरत करावी लागते. कुटुंब आणि नोकरी यांच्या वेगवेगळया अपेक्षामुळे दोन्ही भुमिका निभावतांना त्यांच्यात भुमिका विषयी व्दंव्द निर्माण होतो.

**मुख्यशब्द :** नौकरी करणाऱ्या स्त्रिया, सक्षमीकरण, लिंगभाव विषमता, कौटूंबिक व सामाजिक समस्या स्थिती.

## प्रस्तावना :

भारतात प्राचीन काळापासून लिंग विषमतेमुळे स्त्रियांना दुय्यम दर्जा देण्यात आला आहे. सामाजिक जीवनात सुध्दा त्यांना कोणतेही स्थान देण्यात आले नाही. विभिन्न समाजातील स्त्रियांच्या स्थानाचा विचार केला तर स्त्रियाबाबत हा भेदभाव सार्वत्रिक असल्याचे दिसुन येते. बालविवाह, बहुपत्नीय, बेकायदेशीर गर्भपात, स्त्रिला वारसा अधिकाराचा अभाव, मालमत्तेच्या विभाजनात दुय्यम स्थान, स्त्री शिक्षणाची अनास्था, समान वेतनाचा अभाव, मातृत्व लाभाची अनुपलब्धता अशा कित्येक सामाजिक अवहेलना महिलांना सहन कराव्या लागतात. असे गुलामगिरीचे जीवन विसाव्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत तरी भारतीय स्त्रियांच्या नशिबी होते. परंतु विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व त्यापूर्वी अल्पप्रमाणात करण्यात आलेल्या कायद्यामुळे स्त्री पुरूष विसंगतीची दरी काही प्रमाणात कमी करण्यात यश प्राप्त झाले. हिंदु विवाह कायदा, दत्तक ग्रहण व निर्वाह कायदा, हुंडा विरोधी कायदा, घटनादत्त अधिकार इत्यादी कायद्यामुळे स्त्रियांना कायदेविषयक सामाजिक संरक्षण प्राप्त झाले.

भारतीय जनगणनेनुसार सन २०११ मध्ये देशातील एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांचे प्रमाण ४८ टक्के आहे. म्हणजे भारताच्या लोकसंख्येत महिलांची संख्या पुरूषाबरोबर आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात महिलांची भूमिका महत्वपूर्ण आहे. तरीही तिच्या मुलभूत सोयीकडे दुर्लक्ष केले जाते. स्वातंत्र्याचा अधिकार, जीवन जगण्याचा अधिकार या अंतर्गत महिलांना सुध्दा उत्तम रितीने जीवन जगण्याचे अधिकार भारतीय संविधानाने महिलांना दिले आहेत. पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांना राजकीय व्यवस्थेत सत्ता प्राप्तीची संधी उपलब्ध झाली. काही महिलांनी या संधीचे सोने केले आहे. महिलामध्ये शिक्षणाचे व जागृतीचे प्रमाण वाढीत असल्याकारणाने त्यांना नौकरी व्यवसायात महत्वपूर्ण स्थान त्यांच्या कर्तबगारीमुळे मिळु लागले आहे. नोकरी व्यवसाय करीत असतांनी कौटुंबिक जबाबदारीचे निर्वहन सुध्दा त्यांना करावे लागते. हे कार्य करीत असतांना त्यांना कौटुंबिक व सामाजिक

समस्यांची जाणीव होऊ लागली. त्यामुळे त्यांच्या या समस्याचे अध्ययन करणे गरजेचे झाले आहे.

**संशोधनपूर्व आढावा :**

या विषयाचे अनुषंगाने यापूर्वी विविध संस्थांनी नोकरी करणाऱ्या महिलाच्या समस्येवर विविध पैलुनी संशोधन केले आहे. भारत शासन आर्थिक सर्वेक्षण अहवाल, राष्ट्रीय लोकवित्त आणि निती संस्थान, अहमदाबाद महिला कार्यगट यांचा अहवाल, दिल्लीच्या शहानाशेख यांनी केलेले संशोधन यामध्ये नोकरी करणाऱ्या महिलांच्या दयनिय स्थितीबद्दल विवेचन केले आहे. महिलांना व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनात विविध समस्यांना सामोरे जावे लागते. शोभिता जैन यांनी त्यांच्या भारतातील कुटुंब विवाह व नातेसंबंध (२००४) या पुस्तकात भारतातील पितृसत्ताक कुटुंब, विवाह आणि नातेसंबंध यांची सविस्तर व्याख्या करून कुटुंब व्यवस्था कशी कार्य करते याचे विवेचन केले आहे. वृंदा करात यांनी भारतीय स्त्री, संघर्ष आणि मुक्ती (२००८) या पुस्तकात भारतातील महिलेच्या बहुआयामी संघर्षाचे कथन करून आजच्या जागतिकीकरणाच्या परिदृश्यात महिलेल्या व्यापारीक उपयोग व महिलांविरूध्द होणाऱ्या हिंसेचे विस्तृत विवेचन केले आहे. रेणुका नायर यांनी महिलांच्या वेदना (१९९७) या पुस्तकात महिलांवर सतत होणाऱ्या अत्याचाराचे कथन केले आहे. ज्यात महिलांना भेडसावणाऱ्या नवनव्या समस्याचे विवेचन करण्यात आले होते. या सर्व अध्ययनाचा विचार करून आधुनिक काळातही महिलांना विविध प्रकारच्या समस्या व आव्हानांचा प्रतिकार करावा लागतो. जागतिकीकरणाच्या या युगात नोकरी व्यवसायानिमित्य महिलांना घराबाहेर पडावे लागत असल्यामुळे त्यांना विविध समस्या निर्माण झाल्या आहेत असे संशोधकाच्या दृष्टीपथात आल्यामुळे यांचा साकल्याने विचार करून चंद्रपूर जिल्हयातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या कौटुंबिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन या संशोधन प्रकल्पात करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१) नोकरी करणाऱ्या महिलांच्या कौटुंबिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) नोकरी करणाऱ्या महिलांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

३) नोकरी करणाऱ्या महिलांच्या कार्यालयातील महिलांना आवश्यक असणाऱ्या सोयी, सुविधांचा वेध घेणे.

**अध्ययन क्षेत्र :**

१९९४ च्या महिला आरक्षण कायद्यानुसार अनेक महिला विविध क्षेत्रात नोकरी करीत आहेत. हे करतांना त्यांना व्यक्तीगत व सामाजिक जीवनात विविध समस्या भेडसावतात. याचे अध्ययन चंद्रपूर जिल्हयाच्या संदर्भात करण्यात आले आहे. याकरिता चंद्रपूर जिल्हयातील विविध कार्यालयात नोकरी करणाऱ्या महिलांचे सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून अध्ययन करण्यात आले आहे.

चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्य व विदर्भातील एक पर्यटन व ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा आहे. या जिल्हयाचे क्षेत्रफळ ५१९३ चौ. कि. मी. आहे.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला आहे. संशोधनानंतर प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात अध्ययन करण्याकरीता नमुना पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. या सर्वेक्षणासाठी चंद्रपूर जिल्हयातील काही निवडक तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अध्ययनासाठी चंद्रपूर जिल्हयातील एकुण १०० नोकरी करणाऱ्या महिलांची नमुना एकक म्हणून निवड करण्यात आली आहे. नमुना निवडीसाठी

I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 144-150
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

संभाव्यता नमूना (Probability Sampling) निवड पध्दतीतील स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. उत्तरदात्याची निवड करण्यासाठी कार्यालयनिहाय स्तरीकरण करून लॉटरी पध्दतीने नमूना एककाची निवड करण्यात आली आहे. याकरिता बॅका, विद्यालय, शासकीय कार्यालय, गैरशासकीय कार्यालय यामध्ये कार्य करणाऱ्या प्रत्येकी २५ महिला कर्मचारी याप्रमाणे १०० उत्तरदात्यांची नमुना एकक म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून मूलाखत अनुसुचिचा वापर करून प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे.

**नोकरी करणाऱ्या महिलांची कौटुंबिक स्थिती :**

भारतीय समाजव्यवस्थेत संयुक्त किंवा विभक्त कुटुंब पध्दती आजही अस्तित्वात आहेत. नोकरी व्यवसायानिमित्य बाहेरगावी राहावे लागत असल्यामुळे काही ठिकाणी विभक्त कुटुंब पध्दती आहे. तर काही परिवार हे संयुक्त कुटुंब पध्दतीत जीवन जगतांना दिसतात. संयुक्त किंवा विभक्त कुटुंब असले तरीही त्या कुटुंबात नोकरी करणाऱ्या महिलांना घरातील निर्णय प्रक्रियेत सहभाग करून घेणे गरजेचे आहे. कुटुंबातील महत्वपूर्ण निर्णय प्रक्रियेत घरातील महिलांना स्थान आहे काय हे जाणून घेण्यासाठी कौटुंबिक निर्णयात तुमचे स्थान काय? या प्रश्नातून उत्तरदात्यांचे मत सारणी क्र. १ मध्ये जाणून घेण्यात आले आहे.

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, नोकरी करणाऱ्या ७५ टक्के महिलांना कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान दिला जाते. महिला हया अर्थप्राती करीत असल्या तरीही त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले जात नाही. १५ टक्के महिलांना कुटुंबातील कोणताही निर्णय घेतांना विचारणा होत नाही. घरातील कर्ता पुरूष मंडळीच कुटुंबातील सर्व निर्णय घेतात. १० टक्के महिलांना कुटुंबातील निर्णयात महत्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. या १० टक्के महिला विभक्त कुटुंब पध्दतीत जीवनवापन करणाऱ्या महिला असून त्याचे कुटुंब हे पुर्णरित्या शिक्षित असल्याचे दिसून आले आहे. यावरून नोकरी करणाऱ्या महिलांचे कुटुंब शिक्षित आणि विभक्त असेल तर त्यांना कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते. अन्यथा आजही कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान दुय्यम असल्याचे दिसुन येते.

नोकरी करणाऱ्या महिलांना आर्थिक प्राप्तीमुळे कुटुंबात मान, सन्मान मिळतो, त्यांना कुटुंबात उच्च स्थान प्राप्त होते अशी धारणा पहावयास मिळते नोकरी करणाऱ्या महिलांचे कुटुंबात स्थान कोणते हे सारणी क्र. २ मधून जाणुन घेण्यात आले आहे.

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, ६२ टक्के महिलांना आर्थिक परावलंबित्व नसल्याचे दिसून येते. २८ टक्के महिलांना आर्थिक परावलंबित्व आहे तर १० टक्के महिलांना याचे उत्तर सांगता आले नाही, यावरून नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या गरजेनूसार त्या आर्थिक विनीमय करू शकतात म्हणजेच त्यांना खरेदी करण्याकरीता दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत नाही. नोकरी करणाऱ्या महिलाचे आर्थिक परावलंबित्व नोकरीमुळे नष्ट होते असे दिसून येते. तरीही २८ टक्के महिला या आर्थिक बाबीकरीता पतीवर अवलंबून आहेत. २८ टक्के महिला स्वत:चे वेतन कुटुंबातील प्रमुख किंवा पतीकडे जमा करतात आणि त्यांना आवश्यक त्या प्रसंगी पतीकडून काही रक्कम खर्च करण्याकरीता मागावी लागते. हे आर्थिक परावलंबित्व संयुक्त कुटुंबात मोठया प्रमाणात दिसून आले आहे.

**नोकरी करणाऱ्या महिलांची सामाजिक स्थिती :**

नोकरी करणाऱ्या महिलांना आर्थिक प्राप्तीमुळे समाजात उच्च दर्जा प्राप्त होतो. त्यांना समाजात सन्मानाने वागणुक मिळते. परंतु चंद्रपूर

जिल्हयातील नोकरी करणाऱ्या महिलांना समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त झाले आहे काय, त्यांची सामाजिक स्थिती कशाप्रकारची आहे याचे अध्ययन करण्याकरीता नोकरी करणाऱ्या महिलांना सामाजिक जीवनात पडदा पध्दतीचा वापर करता काय? हे प्रश्न विचारण्यात आले. याची प्राप्त माहिती सारणी क्र. ३ मध्ये दिली आहे.

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, ८० टक्के नोकरी करणाऱ्या महिलांना समाजात पुरूषाबरोबरीचे स्थान नाही. त्यांना पुरूषाबरोबर समाजात दुय्यम दर्जा देण्यात येतो. १३ टक्के महिलांना समाजात पुरूषाबरोबर स्थान दिल्या जाते. तर ७ टक्के महिलांना याचे समर्थक उत्तर देता आले नाही. यावरून महिला नोकरी करीत असल्या तरीही त्यांना समाजात मोठया प्रमाणात पुरूषाबरोबरचे स्थान किंवा दर्जा प्राप्त होत नाही. उच्च शिक्षित कुटुंबात महिलांना पुरूषाबरोबर दर्जा प्राप्त झाला आहे. कारण कुटुंबातील उच्च शिक्षित लोक महिलांना कुटुंबात तसेच समाजात बरोबरीने स्थान देतात. परंतू यांचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून आले आहे.

**कार्यालयात महिलांकरीता सुविधा :**

नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात अविरत कार्य करावे लागते. त्यांना आवश्यक त्या प्रसंगी किंवा कार्यालयात विश्रांतीच्या निर्धारीत वेळेत बसण्याकरीता सुविधायुक्त वेगळे कक्ष असणे गरजेचे आहे. या कक्षाचा वापर त्या आपल्या गरजेनुसार आवश्यक त्या प्रसंगी अधिकाराने करू शकतात. काही विशिष्ट कार्य सर्वासमोर करणे लज्जास्पद वाटत असल्यामुळे त्यांना हिरकणी सारखे वेगळे कक्ष असणे गरजेचे आहे. महिलांना कार्यालयात वेगळे बसण्याकरीता सुविधायुक्त कक्ष आहे काय ? याची माहिती सारणी क्र. ४ मध्ये जाणून घेण्यात आली आहे.

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, ८२ टक्के महिलांना कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या प्रसंगी बसण्यासाठी सुविधायुक्त वेगळे कक्ष नाहीत. फक्त १८ टक्के महिलांनाच अशाप्रकारचे कक्ष उपलब्ध आहे. यावरून असे निदर्शनास येते की, बहुसंख्य महिला ज्या शासकीय, गैरशासकीय, विद्यालयात कार्य करतांना त्यांना असे सुविधायुक्त वेगळे कक्ष नसल्याचे दिसून आले आहे. परंतू बॅंका आणि काही शासकीय कार्यालयात आवश्यक प्रसंगी बसण्याकरीता वेगळे कक्ष आहेत. परंतू हे प्रमाण अल्प आहे.

प्रत्येक कार्यालयात महिलांकरीता विशेष स्वच्छतागृह असणे गरजेचे आहे. वेगळे स्वच्छता गृह असल्यास महिला कर्मचाऱ्यांना वैयक्तिक स्वच्छतेकरीता संकोच वाटत नाही. याकरीता कार्यालयात महिलांना वेगळे स्वच्छतागृह ठेवली जातात. महिला कर्मचाऱ्यांकरीता कार्यालयात वेगळे स्वच्छतागृहाची व्यवस्था आहे काय ? हे सारणी क्र. ५ मधून जाणुन घेण्यात आले आहे.

उपरोक्त सारणीवरून असे निदर्शनास येते की, ९० टक्के महिला कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात महिलांकरीता वेगळे स्वच्छतागृह आहे. ८ टक्के महिला कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात अषी वेगळी स्वच्छतागृहे नाही. त्यांना पुरूशांच्या स्वच्छतागृहाचा वापर करावा लागतो. तर २ टक्के महिलांनी याबद्दल संदिग्धता व्यक्त केली आहे. यावरून सर्वच महिला कर्मचाऱ्यांना कार्यालयात वेगळे स्वच्छतागृह असल्याचे दिसून येते. गैरशासकीय कार्यालयात अशा प्रकारची वेगळी स्वच्छतागृहे नाहीत, परंतु याचे प्रमाण अत्यल्प आहे.

**निष्कर्ष** : उत्तरदात्याव्दारे प्राप्त माहितीच्या आधारावर या संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. नोकरी करणाऱ्या महिलांचे कुटुंब शिक्षित आणि विभक्त असेल तर त्यांना कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत

सहभागी करून घेतले जाते. अन्यथा आजही कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान दुय्यम असल्याचे दिसून आले आहे.

२. नोकरी करणाऱ्या महिला हया आर्थिक प्राप्ती करीत असल्या तरीही त्यांना कुटुंबात महत्वपूर्ण स्थान नाही. परंतू शिक्षित कुटुंबात नोकरी करणाऱ्या महिलांना प्रथम स्थान आहे. याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले आहे.

३. नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या गरजेनुसार त्या आर्थिक विनीमय करू शकतात म्हणजेच त्यांना खरेदी करण्याकरीता दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागत नाही. नौकरी करणाऱ्या महिलाचे आर्थिक परालंबित्व नोकरीमुळे नष्ट होते असे दिसून आले आहे.

४. महिला आर्थिक प्राप्ती करीत करीत असल्या तरीही त्यांच्या नावाने कोणतीही संपत्ती नसून पतीच्या नावे सर्व आर्थिक व्यवहार चालतांना दिसतात.

५. नोकरी करणाऱ्या महिलांना मोठया प्रमाणात समाजात कोणतीही संपत्ती नसुन पतीच्या नावे सर्व आर्थिक व्यवहार चालतांना दिसतात.

६. महिला नोकरी करीत असल्या तरीही त्यांना समाजात मोठया प्रमाणात पुरूषांबरोबरचे स्थान किंवा दर्जा प्राप्त होत नाही. उच्च शिक्षित कुटुंबात महिलांना पुरूषाबरोबर दर्जा प्राप्त झाला आहे. कारण कुटुंबातील उच्च शिक्षित लोक महिलांना कुटुंबात तसेच समाजात बरोबरीने स्थान देतात.

७. बहुसंख्य महिला ज्या शासकीय, गैरशासकीय, विद्यालयात कार्य करतांना त्यांना सुविधायुक्त वेगळे कक्ष नसल्याचे दिसून आले आहे.

८. महिला कर्मचाऱ्यांना कार्यालयात वेगळे स्वच्छतागृह असल्याचे दिसून येते. गैरशासकीय कार्यालयात अशा प्रकारची वेगळी स्वच्छतागृहे नाहीत, परंतू याचे प्रमाण अत्यल्प आहे.

९. नोकरी करणाऱ्या महिलांची आजही कौटुंबिक स्थिती दुय्यम दर्जाची आहे. त्यांना निर्णय प्रक्रियेत किंवा सन्मानणीय वर्तनात दुय्यम स्थान आहे.

१०. नोकरी करणाऱ्या महिलांची सामाजिक पर्यावरणात वर्तन स्वातंत्र्य असले तरीही त्यांचे सामाजिक स्थान आहे.

**उपाययोजना :**

या संशोधन विषयाच्या सखोल अध्ययनानंतर शोध निबंधाच्या उत्तरार्धात निष्कर्षाअंती नोकरी करणाऱ्या महिलांच्या कौटुंबिक व सामाजिक स्थितीत सुधारणा होण्याकरीता काही उपाययोजना संशोधकाव्दारे सुचविण्यात आलेले आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

१. महिलांना स्वत:चे अधिकार व कर्तव्याची संपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. महिला स्वत:चे कर्तव्य बजावतात. परंतू त्यांना मिळालेल्या अधिकाराप्रती त्या जागृत असल्या पाहीजे व आवश्यक त्या प्रसंगी त्यांनी कौटुंबिक समन्वयाने अधिकाराचा वापरही केला पाहीजे.

२. रूढी, परंपरा, प्रथा यांचा पगडा महिलांवर मोठया प्रमाणात आहे. त्यांनी स्वत: विज्ञानवादी शिक्षण घेवुन रूढी, प्रथा, परंपरा यांची प्रासंगितता जाणून घेणे गरजेचे आहे. संस्कृतीक जतनाची सामाजिक जबाबदारी महिलांची आहे असे समजण्यात येते. त्यामुळे अप्रासंगिक संस्कृती व रूढींचा त्याग करून समाजात स्वत: समोर येवुन स्थान मिळविण्याकरिता प्रयत्न करणे गरजेचे आहे.

३. कुटुंबात व समाजात कायद्याने महिलांना अधिकार दिले असले तरीही पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे पुरूष त्यांना हे अधिकार देण्यास असमर्थता दर्शवितात अशा प्रसंगी महिलांनी प्रेमाने, समन्वयाने आणि आवश्यक प्रसंगी कायद्याने या अधिकाराच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणे गरजचे आहे.

पुरूषांनी आपल्या सामाजिक दृष्टीकोनात बदल करणे गरजेचे आहे. पुरूशांच्या पुढाकाराने महिलांना समाजात उच्च दर्जा प्राप्त होऊ शकतो.

**संदर्भ :**

नायर रेणूका, औरत की पिढा, अभिषेक प्रकाशन, चंदीगड, २००५

करात वृंदा, भारतीय नारी, संघर्श और मुक्ती, ग्रंथ शिल्पी प्रकाशन, दिल्ली २००८

जैन अरविंद, औरत होने की सजा, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, २००६

सिन्हा मृदला, मात्र देही नही औरत, सामाजिक प्रकाशन, नई दिल्ली, २००७

राजकुमार, नारी शोषण : समस्या एवं समाधान, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००९

श्रीनिवास एम. एन., आधुनिक भारत में सामाजिक परिवर्तन, राजकमल प्रकाशन, दिल्ली, १९६७

नांदेडकर व्ही. जी., पंचायत राज एवं विश्लेषणात्मक परामर्श, के सागर प्रकाशन, पुणे, २००८

श्रीवास्तव सुधाराणी, महिला शोषण एवं मानवाधिकार, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१०

रस्तोगी आर. के., लिग व समाज, सजीव प्रकाशन मेरठ

रस्तोगी आर. के., ग्रामीण समाजशास्त्र, सजीव प्रकाशन मेरठ

लोटे रा. ज., भारतातील सामाजिक समस्या

**सारणी क्र. १ कौटुंबिक निर्णयातील स्थान**

| अ. क्र. | महिला कर्मचाऱ्याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महत्वपूर्ण | १० | १० |
| २ | दुय्यम स्थान | ७५ | ७५ |
| ३ | विचारणा होत नाही | १५ | १५ |
| | एकुण | १०० | १०० |

**सारणी क्र. २ विनिमयाचे आर्थिक परावलंबीत्व**

| अ. क्र. | महिला कर्मचाऱ्याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८ | २८ |
| २ | नाही | ६२ | ६२ |
| ३ | सांगता येत नाही | १० | १० |
| | एकुण | १०० | १०० |

**सारणी क्र. ३ समाजात पुरूषाबरोबर स्थान**

| अ. क्र. | महिला कर्मचाऱ्याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १३ | १३ |
| २ | नाही | ८० | ८० |
| ३ | सांगता येत नाही | ७ | ७ |
| | एकुण | १०० | १०० |

**सारणी क्र. ४ बसण्यासाठी वेगळे कक्ष**

| अ. क्र. | महिला कर्मचाऱ्याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १८ | १८ |
| २ | नाही | ८२ | ८२ |
| | एकुण | १०० | १०० |

**सारणी क्र. ५ वेगळे स्वच्छतागृह**

| अ. क्र. | महिला कर्मचाऱ्याचे मत | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९० | ९० |
| २ | नाही | ८ | ८ |
| ३ | सांगता येत नाही | २ | २ |
| | एकुण | १०० | १०० |